क्र.साप्रवि/रवका/न.क्र.२२/
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

## <u>प्रशासकीय परिपत्रक क्र. २५१ दिनांक ०१ / १० / २००९</u>

**<u>विषय</u>** : मृत कर्मचाऱ्यांच्या अवलंबितांस एम.एस.सी.आय.टी. परीक्षा उत्तीर्ण करण्यासाठी विहीत केलेल्या कालावधीत वाढ करण्याबाबत.

**<u>संदर्भ</u>** : १) स.सा.आदेश क्र.११२ दिनांक १२/०२/१९६२ ची सुधारचिठ्ठी क्र.२८, दिनांक १६/०४/१९७५.
२) प्रशासकीय परिपत्रक क्र.१७५ दिनांक २६/०९/२००८.

.......

मृत कर्मचाऱ्यांचे जे वारस पदवीधर आहेत व ज्यांनी <u>एम.एस.सी.आय.टी.</u> प्रमाणपत्र धारण केलेले नाही अशा वारसांना त्यांच्या नियुक्तीनंतर ६ (सहा) महिन्यांच्या आत त्यांना एम.एस.सी.आय.टी. परीक्षा उत्तीर्ण होण्याच्या अटीवर <u>निम्नस्तर लिपिक/कार्यालयीन सहाय्यक या पदी</u> नियुक्त करण्याबाबतच्या सूचना प्रशासकीय परिपत्रक क्र. १७५, दिनांक २६/०९/२००८ अन्वये देण्यात आलेल्या आहेत. तथापि, सदर ६(सहा) महिन्यांच्या कालावधीत काही अवलंबित <u>एम.एस.सी.आय.टी.</u> परीक्षा उत्तीर्ण होऊ शकले नाहीत असे निदर्शनास आल्याने अशा अवलंबितांना एम.एस.सी.आय.टी. प्रमाणपत्र धारण करण्याकरीता मुदतवाढ देण्याबाबतचा प्रस्ताव कंपनीच्या विचाराधीन होता.

२. या अनुषंगाने व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक (प्रकल्प), संचालक(संचलन) आणि संचालक(वित्त) यांच्याशी विचारविनिमय करुन मृत कर्मचाऱ्यांच्या ज्या पदवीधारक अवलंबितांना निम्नस्तर लिपिक/कार्यालयीन सहाय्यक या पदावर नियुक्त करण्यात आलेले आहे, परंतु प्रशासकीय परिपत्रक क्र.१७५ दि.२६.०३.२००८ अनुसार अद्याप एम.एस.सी.आय.टी. प्रमाणपत्र धारण केलेले नाही अशा कर्मचाऱ्यांना सदर प्रमाणपत्र धारण करण्यासाठी दिनांक ३०/०४/२०१० पर्यंत मुदतवाढ देण्यास मंजुरी प्रदान केली आहे.

३. मृत कर्मचाऱ्यांचे असे जे अवलंबित निम्नस्तर लिपिक/कार्यालयीन सहाय्यक पदावर नियुक्ती दिल्यानंतर दिनांक ३०/०४/२०१० पर्यंत एम.एस.सी.आय.टी. परीक्षा उत्तीर्ण होणार नाहीत अशा कर्मचाऱ्यांची सेवा समाप्त करण्यात येईल. तसेच संबंधित अवलंबितांना अनुकंपा तत्त्वावर नोकरी देण्याबाबतचा कोणताही दावा करता येणार नाही.

४. सदर प्रशासकीय परिपत्रक <u>www.mahadiscom.in</u> या कंपनीच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले आहे.

***( सु.य.पाटील )***
***मुख्य महाव्यवस्थापक (क)***

प्रत :
म.रा.वि.वितरण कंपनीच्या प्रेषण यादीप्रमाणे.

*D:\O&M\Adm.Cir - 22 - C.S.28 doc*
*30/09/09*